जा.क्र/जिपऔ/शिक्षण/प्राथि-३/२०१३-२०१४/२२२३
कार्यालय जिल्हा परिषद,औरंगाबाद.
दिनांक. १८.०६.२०१४

प्रति,

अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक
सौ.गंधारीबाई प्रतिष्ठाण,प्लॉट नं-६९/अ,एफ-१,एन-४,सिडको औरंगाबाद
**ज्ञानदान प्राथमिक विद्यालय,**
बीड बाय पास, बाळापुर रोड, औरंगाबाद.

**विषय : नेमणूक / सेवासातत्यास मान्यता मिळणे बाबत**
संदर्भ : १. शासन निर्णय क्रमांक : पीआरई -२००६/(५११८/०६)/प्राशि-१, मंत्रालय विस्तार भवन,मुंबई ४०० ०३२,दिनांक २५ मे २००९.
२. आपला प्रस्ताव दिनांक ०५.०९.२०१३

आपल्या संदर्भिय पत्रान्वये खालिल नमुद केलेल्या कर्मचाऱ्यास सहशिक्षक या पदांवर केलेल्या नियुक्तीस त्यांच्या नावापूढे नमूद केल्या प्रमाणे संदर्भिय - १ वरील शासन निर्णयानुसार सहशिक्षक म्हणून खालिल अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

**- आदेश -**

| अ क्र | कर्मचाऱ्याचे नांव | जात | जन्म दिनांक | प्रथम नेमणूक दिनांक | शैक्षणिक पात्रता | हुद्दा पद | बँड पे / ग्रेड पे | विवरण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **श्रीम. जाधव शोभा पुंडलिक** | **हिंदु / मराठा (खुला)** | ०२.०४.१९८२ | **२१.०८.२०१३** | एम.एस.सी. डी.एड. | **सहशिक्षक** | **५२००-२०२००** / **२८००** | दिनांक २१/०८/२०१३ ते २०/०८/२०१५ या दोन वर्षाचा परिविक्षाधिन कालावधीकरीता सहशिक्षक पदासाठी विनाअनुदानित तत्वावर मान्यता |

***(टिपः शासन नियमानुसार नियुक्तीच्या दिनांका पासून दोन वर्षात MSCIT परिक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे तसेच संबधितानी नियुक्ती झाल्याच्या तारखेपासून सहा महिण्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करावे नसता दिलेली मान्यता रद्द समजण्यात यईल.)***

उपरोक्त मान्यता महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवाशर्ती) नियम १९८१ व कलम (१) मधील तरतूदीनूसार संच मान्यतेच्या अधिन राहून तात्पूरत्या स्वरुपात देण्यात आलेली आहे.ज्या शिक्षकांना नेमणूकीच्या तारखेपासून शालेय वर्षाअखेर पर्यत मान्यता दिलेल्या आहेत.त्या शिक्षकांना वर्षाअखेरीस सेवेतून कार्यमुक्त करावे.तसेच मान्यता दिलेले शिक्षक भरुन आपल्या शाळेतील शिक्षकांची संख्या या कार्यालयास निश्चीत केलेल्या शिक्षक संख्येला जास्त होता कामा नये.वरिल नेमणूकीस मान्यता दिल्यामुळे आपल्या शाळेतील उपरोक्त पात्रतेची कायम शिक्षक अतिरीक्त झालेले आढळून आल्यास मान्यता रद्द केली जाईल.उपरोक्त वैयक्तिक मान्यता संस्थेने,मुख्याध्यापकाने दिलेल्या कागदी पूराव्याच्या आधारे देण्यात आलेली आहे.ज्या मध्ये भविष्यात तफावत अथवा दिलेली कागदपत्रे खोटी तसेच शासन नियमांच्या विरुध्द आढळून आल्यास सदर मान्यता रद्द समजावी.

-sd-
**शिक्षणाधिकारी(प्राथमिक)**
**जिल्हा परिषद,औरंगाबाद**

**<u>प्रतिलिपी</u>**
१.अधिक्षक,वेतन पथक (प्राथमिक)जिल्हा परिषद,औरंगाबाद.
२.संबधीतास,मुख्याध्यापका मार्फत.

**शिक्षणाधिकारी(प्राथमिक)**
**जिल्हा परिषद,औरंगाबाद**